
आठवण...
दैना केलीस, श्यामल नभा ।
चिंब उभी मी, झोंबे गारवा ॥
भेट तुझी रे, ओढ मनाची
समजूत कैसी, घालू मनाची
तुझी आठवण, तुझी साठवण ॥ १ ॥
चाहूल तुझी रे, सावरते मी
माझी मुळी ना, राहते रे मी
तुझी आठवण, भासे श्रावण ॥ २ ॥
गंध निषेचा, माळून येई
गुज तारकांचे, दाटून येई
तुझी आठवण, माझे आंगण ॥ ३ ॥
© www.saarthbodh.com